दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990



Bharat Chandak

SATYA ELECTRICALS

POLYCAB Racold legrand HAVELLS INDOASIAN Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS

Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512

Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018

Email:satyaelectricals@rediffmail.com



लातूर वर्ष ३ रे अंक २५६ वा शनिवार दि.१६ मार्च २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## ठोस काय ते बोला, आम्ही अंदाजावर काम करू शकत नाही; ईव्हीएम विरोधातील याचिका फेटाळली

नवी दिल्ली : निवडणुका आल्या की मतदान यंत्र अर्थात ईव्हीएम मशीनमध्ये काहीतरी गडबड असल्याच्या बातम्या यायला सुरुवात होते. मग याविरोधात न्यायालयात याचिका दाखल होतात. अशाच अनेक याचिकांवर सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी देखील अनेकदा सुनावणी केली आहे. मात्र, आजवर एकाही याचिकाकर्त्याला या यंत्रांमध्ये दोष असल्याचे सिद्ध करता आलेले नाही. शुक्रवारी पुन्हा एकदा यासंदर्भातील याचिका सर्वोच्च न्यायालयासमोर सुनावणीसाठी आली. आणखी किती वेळा या एकाच विषयावर सुनावणी घ्यायची आहे, अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने ईव्हीएमविरोधातील याचिका फेटाळून लावली आहे.




केवळ अंदाजावर काम करता येत नाही

सर्वोच्च न्यायालयाचे न्या. संजीव खन्ना, न्या. दीपंकर दत्ता आणि न्या. ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. न्यायालयाने ईव्हीएमच्या कामाशी संबंधित याचिकांवर आधीच सुनावणी केली आहे. अलीकडेच आम्ही व्हीव्हीपॅटशी संबंधित याचिकेवरही सुनावणी केली. आम्ही केवळ अंदाजावर काम करू शकत नाही. ठोस काही असेल तर सांगा, असे खंडपीठाने सांगितले. ईव्हीएममध्ये कथित गैरप्रकार झाल्याचा दावा करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. प्रत्येक प्रक्रियेचे स्वतःचे फायदे आणि तोटे असतात, असे सांगत सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी ही याचिका फेटाळून लावली. भारतीय निवडणूक आयोगाने ईव्हीएम मशिन हॅक करुन दाखवण्याचे खुले आव्हान अनेक वर्षांपूर्वी दिले आहे. आजवर एकानेही हे आव्हान स्वीकारलेले नाही. एव्हीएम हॅक करून दाखवणाऱ्यास रोख रकमेचे इनामही आहे. मात्र, अनेकदा उमेदवार पराभूत झाल्यानंतर ईव्हीएमबाबत शंका व्यक्त करतो; एकाही विजयी उमेदवाराने आजवर ईव्हीएमबाबत संशय व्यक्त केलेला नाही, असे स्पष्टीकरण निवडणूक आयोगाने यापूर्वीच दिलेले आहे. इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनच्या (ईव्हीएम) ऑपरेशनमध्ये अनियमितता असल्याचा दावा करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी फेटाळून लावली.

राहुल गांधींनी व्यक्त केली शंका

भारत जोडो न्याय यात्रेअंतर्गत सध्या महाराष्ट्रात आलेले काँग्रेस नेता राहुल गांधी यांनी देखील नुकतीच या ईव्हीएम बाबत शंका व्यक्त केली आहे. 'कुछ तो है ईव्हीएम में', अशी टिप्पणी त्यांनी आपल्या भाषणादरम्यान केली.

## श्रीकांत शिंदेंनी शिस्त पाळावी

नाशिक : हेमंत गोडसे हे नाशिकचे महायुतीचे उमेदवार असतील, कामाला लागा असे शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी सभेत म्हटले होते. यावरून भाजपा त्यांच्यावर अधिकार नसल्याची टीका करत असताना आता महायुतीतील आणखी एक मित्रपक्ष राष्ट्रवादी देखील श्रीकांत शिंदे यांना अधिकार नसल्याचे म्हणत आहे.नाशिकची जागा जाहीर करण्याचा श्रीकांत यांना काही अधिकार नाही. राजकारणामध्ये थोडी शिस्त ही सगळ्यांनी पाळली पाहिजे, अशा शब्दांत मंत्री छगन भुजबळ यांनी शिंदे यांना फटकारले आहे. तसेच मनसे महायुतीमध्ये आल्यास फायदा होईल का, नाही यावर माझा अभ्यास नसल्याचेही त्यांनी सांगितले. शरद पवारांचा फोटो वापरत असल्यावरून सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार गटाला झापलेले असताना भुजबळ यांनी आम्ही शरद पवारांचा फोटो कुठेही वापरलेला नाही असे सांगितले. परंतु, चिन्ह सध्या आमच्याकडे आहे, त्यामुळे आम्ही ते वापरणारच असेही ठणकावले आहे.मी स्वत: शरद पवार यांचे फोटो कुठेही वापरले नाही. शरद पवार यांचे फोटो दाखवा आणि मत मिळवा मी असे कुठेही म्हणालो नाही. प्रचार करण्यासाठी अजून वेळेच आली नाही. निवडणुका अजून लागल्या नाहीत, असेही भुजबळ म्हणाले. शरद पवारांनी कृषिमंत्री असताना कांद्याला का हमीभाव दिला नाही? त्यांच्या काळात देखील कांद्याचे भाव पडले होते. आता कांद्याचे दर पडले आहेत हे खरे आहे. असे भुजबळ यांनी कबूल केले.



## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आबासाहेब पाटील यांचे मार्केटिंग फेडरेशन मुंबईच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन करून दिल्या शुभेच्छा

लातूर / प्रतिनिधी : – महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशन लि. मुंबईच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल आबासाहेब पाटील यांचे अभिनंदन करून राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशैल उटगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव अभय साळुंके, माजी नगराध्यक्ष हमीद शेख, रामदास पवार, शरद पाटील, सुधाकर सांडूर, प्रताप शिंदे, संतोष सांडूर आदी उपस्थित होते.



## सुधाकर द्विवेदीविरोधात वॉरंट जारी

मुंबई : मालेगाव २००८ बॉम्बस्फोट प्रकरणाची सुनावणी करणा–या मुंबई सत्र न्यायालयातील विशेष एनआयए कोर्टाने आरोपी क्रमांक १० सुधाकर द्विवेदी उर्फ दयानंद पांडे याच्या विरोधात १० हजार रुपयांचे जामीनपात्र वॉरंट जारी केले आहे. पुढील सुनावणीत हजर न झाल्यास अजामीनपात्र वॉरंट जारी होणार असल्याचे कोर्टाने म्हटले आहे.मालेगाव २००८ बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी सुधाकर द्विवेदीविरुद्ध जामीनपात्र वॉरंट जारी करण्यात आले आहे. कोर्टाने नुकतेच या प्रकरणात आरोपी असलेल्या साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर यांच्याविरोधातही जामीनपात्र वॉरंट जारी केला आहे. सुनावणीच्यावेळी सुधाकर द्विवेदीही न्यायालयात सातत्याने गैरहजर राहिले आहेत. त्यामुळे विशेष न्यायाधीश लाहोटी यांनी याबाबत गंभीर दखल घेतली आहे. सुधाकर द्विवेदी विरोधात १० हजार रुपयांचे जामीनपात्र वॉरंट जारी करण्यात आले. पुढील सुनावणीत हजर न राहिल्यास अजामीनपात्र वॉरंट जारी होणार असल्याचेही कोर्टाने म्हटले आहे.२० मार्चपर्यंत अहवाल सादर करण्याचा आदेश मालेगाव बॉम्बहल्ल्यातील आरोपी प्रज्ञासिंह ठाकूर तसेच इतर आरोपींना मुंबईच्या विशेष न्यायालयाने सोमवारी कोर्टात हजर राहण्याचा आदेश दिला होता. मात्र प्रज्ञासिंह ठाकूर न्यायालयात हजर राहिल्या नाही.

## भारतातील १४० कोटी समाज हा हिंदूच



नागपूर : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य देशभर वाढत असून अनेक तरुण संघाशी जुळत आहेत. संघाच्या संकेतस्थळावर दरवर्षी 'जॉईन आरएसएस' म्हणून एक लाख लोकांचे विनंती अर्ज येतात. भारतातील १४० कोटी समाज हा हिंदूच आहे. सर्वांचे पूर्वज हे हिंदूच होते, असे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सह सरकार्यवाह मनमोहन वैद्य यांनी म्हटले आहे.अखिल भारतीय प्रतिनिधी सभेच्या निमित्ताने मनमोहन वैद्य यांनी मीडियाशी संवाद साधला. राम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानंतर देशात एक चैतन्य आणि ऊर्जेचे वातावरण निर्माण झाले. अल्पसंख्यांक समाजाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाविषयी चुकीची माहिती देण्यात आल्याने त्यांच्यात संघाविषयी गैरसमज होते. आता त्यांच्यातील भीतीचे वातावरण कमी होत आहे असे वैद्य यांनी सांगितले. देशातील ९२२ जिल्ह्यांमध्ये म्हणजेच ९९ टक्के जिल्ह्यात संघाच्या संघाचे शाखा सुरू आहेत, तर ६५९७ तालुका ठिकाणी शाखा आहेत. मागील काही वर्षांपासून संघाच्या विस्तारामध्ये मोठी वाढ झालेली आहे. संघाचे काम वाढत असल्याने दहा ते पंधरा गावांचा समूह घेऊन मंडल तयार करण्यात आले असून ५८९८ मंडळांमध्ये सध्या शाखा सुरू आहेत. सध्या देशात ७३,१७७ नियमित शाखा सुरू आहेत. यात ६० टक्के शाखा ह्या विद्यार्थ्यांच्या तर ४० टक्के शाखा व्यवसायिक आणि नोकरदारांचे आहेत. अकरा टक्के शाखा तरुणांच्या आहेत. त्यामुळे तरुण वर्गाचा सहभाग वाढत असल्याचे दिसून येते. नियमित शाखांशिवाय देशात २७ हजार ७७० साप्ताहिक मिलन शाखा सुरू आहेत, अशी माहिती वैद्य यांनी दिली.

## मोहिते पाटील भाजप विरोधात जाणार नाहीत

सोलापूर–माढा लोकसभा मतदारसंघातून खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना भाजपची उमेदवारी पुन्हा जाहीर झाली आहे. मात्र, निंबाळकर यांना माढ्यातून उमेदवारी दिल्यामुळे मोहिते पाटील नाराज झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. त्यावर सोलापूरच्या दौऱ्यावर आलेले गिरीश महाजन यांनी भाष्य करत दोन ते तीन दिवस नाराजी चालेल. मात्र, विजयदादा आणि रणजितसिंह मोहिते पाटील भाजपविरोधात जाणार नाहीत, असा विश्वास व्यक्त केला आहे.रणजितसिंह नाईक निंबाळकर यांना माढ्यातून लोकसभेची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर मोहिते पाटील समर्थकांची गुरुवारी (ता. १४ मार्च) दिवसभर शिवरत्न बंगल्यावर रिघ होती. माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्याकडे समर्थकांनी तीव्र नाराजीची भावना बोलून दाखवली आहे. त्यामुळे आज शिवरत्न बंगल्यावर होणाऱ्या बैठकीत मोहिते पाटील यांची पुढील रणनीती ठरण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर सोलापूरच्या दौऱ्यावर आलेले गिरीश महाजन यांना यासंदर्भात प्रश्न विचारल्यानंतर त्यांनी मोहिते पाटील हे भाजपविरोधात जाणार नाहीत, असा ठाम विश्वास व्यक्त केला. ते म्हणाले, माढा लोकसभेचे तिकीट आता जाहीर झालेलं आहे. मोहिते पाटील यांची नाराजी २–३ दिवस चालेल. पण, मी आणि देवेंद्र फडणवीस आम्ही दोघे मोहिते पाटील यांच्या संपर्कात असतो. माढ्यात कुठलीही अडचण येणार नाही.आमदार रणजितसिंह मोहिते पाटील आणि माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील हे भाजपविरोधात जाणार नाहीत, असा ठाम विश्वासही त्यांनी व्यक्त केला. त्यामुळे आता मोहिते पाटील यांच्या भूमिकेकडे सोलापूर आणि सातारा जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. माढा लोकसभा मोहिते पाटील लढणार का आणि कोणत्या पक्षाच्या चिन्हावर लढणार, याची उत्सुकता असणार आहे.दरम्यान, काँग्रेस आमदार प्रणिती शिंदे यांच्या भाजप प्रवेशाची कोणतीही चर्चा आमच्याकडे आता नाही. त्यांनी त्यांचं काम करावं. विशेष म्हणजे अद्याप त्यांचीही काँग्रेसकडून उमेदवारी घोषित झालेली नाही. सोलापूरसाठी या वेळेला राज्यात मंत्रिपद देण्याबाबत विचार होईल, असेही विधान महाजन यांनी केले.महाजन म्हणाले, उद्धव ठाकरे यांचे दोन खासदार निवडून येण्याची शक्यता नाही आणि ते नितीन गडकरी यांना उमेदवारी देऊ म्हणतायत.



## रामटेकच्या गडावर कुणाचा दावा ? बावनकुळे म्हणाले....

नागपूर; महायुतीमध्ये असणारे शिवसेनेतील आमदार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सोडून उद्धव ठाकरे गटात जाणार नाहीत असे सांगून भाजपने रामटेक मतदारसंघातील सस्पेन्स वाढविला आहे. नागपूर जिल्ह्यातील शिंदे गटाचे खासदार कृपाल तुमाने यांच्या तिकिटावरून अनिश्चितता आणि भाजपाची दावेदारी उघडपणे व्यक्त होत असताना काँग्रेसचे आमदार राजू पारवे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटले असा दावा भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे.दोनदा खासदार राहिलेले तुमाने यांना आपल्याला पुन्हा तिकीट मिळणार असा विश्वास आहे. भाजपला हा मतदारसंघ आपल्याकडे हवा आहे. यातून भाजपचे माजी आमदार सुधीर पारवे, काँग्रेस आमदार राजू पारवे, जिल्हा भाजप अध्यक्ष अरविंद गजभिये अशी इच्छुकांची नावे आहेत. या पार्श्वभूमीवर बावनकुळे आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व आमदार पारवे यांच्या भेटीबाबत बोलत होते.उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून आमदार राजू पारवे डीपीडीसी अंतर्गत असलेल्या प्रस्तावांच्या संदर्भात भेटले. पारवे यांनी मलाही फोन केला होता असा दावा भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना केला. भाजपाने २० जागा जाहीर केल्या आहेत. ज्या जागांवर एकमत झाले आहे, त्या जागा घोषित करण्याची सहकारी पक्षांना मुभा आहे. महायुतीचे तिन्ही नेते एकत्र येतील व लवकरच उर्वरित जागांवर एकमत होईल.

## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बाभळगाव निवासस्थानी नागरिकांच्या घेतल्या भेटी लातूर लोकसभा निवडणूक अनुषंगाने पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्याशी केली चर्चा

लातूर /प्रतिनिधी : – राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुक्रवार दि. १५ मार्च रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकाऱ्यासह नागरिकांच्या भेटी घेऊन त्यांच्या निवेदनाचा व निमंत्रणाचा स्वीकार करून संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या. तसेच लातूर जिल्हयासह परीसरातून आलेल्या काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्याशी लातूर लोकसभा निवडणूक अनुषंगाने चर्चा केली. पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मते जाणून घेतली. याप्रसंगी लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशैल उटगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, विलास को–ऑपरेटिव बँकेचे व्हा. चेअरमन समद पटेल, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष भाई नगराळे, सरचिटणीस अमर खानापुरे, सचिव अभय साळुंखे, ट्वेन्टीवन शुगरचे व्हॉइस चेअरमन विजय देशमुख, विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन रवींद्र काळे, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सुनील पडीले, संचालक युवराज जाधव, तुकाराम पाटील, लक्ष्मण पाटील, आनंद पाटील, सुभाष घोडके, सुधीर गोजमगुंडे, उदगीर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष कल्याण पाटील, माजी नगराध्यक्षा उषाताई कांबळे, उदगीर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजीराव हुडे, उपसभापती प्रीती भोसले, डॉ. अशोक पोद्दार, डॉ.अनिल राठी, डॉ. आशिष चैपुरे, अजित माने, हमीद शेख, मारुती पांडे, प्रवीण सूर्यवंशी, डॉ.अरविंद भातंबरे, पंकज शेळके, सोनू डगवाले, महेश देशमुख, दीपक राठोड, के.आर सूर्यवंशी, बाभळगावचे उपसरपंच गोविंद देशमुख, महाराणा प्रताप नगरचे उपसरपंच राजकुमार पवार, सतीश देवणे, किशोर बिदादा, व्ही.के आचार्य, धर्मराज बिडवे पापू मलवाडे अनिल मेनकुदळे आदिसह काँग्रेस पक्षाचे विविधपदाधिकारी,कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.



## काँग्रेसचे प्रवक्ते संजय लाखे यांचा शिवसेना उबाठात प्रवेश; जालन्यातून निवडणूक लढविण्याची शक्यता



छत्रपती संभाजी नगर, : काँग्रेसचे प्रवक्ते संजय लाखे पाटील यांनी शुक्रवारी (दि. १५) रोजी आपल्या समर्थकांसह शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. मातोश्री निवासस्थानी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी संजय लाखे यांना शिवबंधन बांधले.यावेळी पक्षाचे नेते चंद्रकांत खैरे, विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, संघटक चेतन कांबळे यांनीही प्रमुख उपस्थिती होती. लाखे हे जालन्यातून शिवसेना उबाठाकडून लोकसभेची निवडणूक लढविण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.महाविकास आघाडीच्या जागा वाटपात शिवसेना उबाठा गटाने छत्रपती संभाजीनगरसोबत जवळ असलेल्या जालना मतदारसंघावर दावा सांगितलेला आहे. ही जागा उबाठा गटाकडे जाण्याची दाट शक्यताही व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे प्रवक्ते संजय लाखे पाटील यांनी शिवसेना उबाठामध्ये प्रवेश केला.

## संपादकीय....

# भाजपची सज्जता

राहुल गांधी यांच्या 'भारत जोडो न्याय यात्रे'मध्ये काँग्रेस मग्न असतानाच भाजपने लोकसभा निवडणुकांसाठी उमेदवारांची दुसरी यादी जाहीर करून टाकली. निवडणूक आचारसंहिता लागण्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विविध राज्यांचा दौरा सुरूच ठेवला असून, हजारो कोटी रुपयांच्या शेकडो प्रकल्पांच्या उद्घाटनांचा त्यांनी धडाका लावला आहे. गेल्या २९ फेब-वारीला झालेल्या पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकीत लोकसभेसाठी १९५ उमेदवारांची पहिली यादी निश्चित झाली आणि २ मार्च रोजी ती जाहीर करण्यात आली. पहिल्या यादीत मोदी, त्याचप्रमाणे लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला आणि ३४ केंद्रीय राज्यमंत्र्यांची नावे समाविष्ट होती. मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांना विदिशामधून तिकीट देऊन त्यांच्या नावावर काट मारण्यात येणार आहे, अशा गप्पांना विराम देण्यात आला.विशेष म्हणजे, लखीमपूर खेरीमधून वादग्रस्त खासदार अजय मिश्रा टेनी, तसेच उन्नावमधून साक्षी महाराज यांना उमेदवारी जाहीर केली गेली. टेनी यांच्या मुलाने काही शेतकर्यांना जीपखाली चिरडले, असा आरोप होता आणि खुद्द टेनी यांनीही वार्ताहरांना धमकावल्याचे व्हिडीओ व्हायरल झाले होते. साक्षी महाराज यांनी धार्मिक द्वेष पसरवणारी वक्तव्ये केल्याचा आरोप होता. खरे तर, या दोघांना घरी पाठवण्यात येईल, असे वाटत होते; परंतु तसे घडले मात्र नाही. आता दहा राज्यांतील ७२ उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली असून, त्यात महाराष्ट्रातील २० जणांचा समावेश आहे. त्यातील ठळक नाव आहे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे. गडकरी यांनी केंद्रीय मंत्री म्हणून पायाभूत क्षेत्र आणि रस्ते विकासात नेत्रदीपक कामगिरी बजावली आहे. लोकसभा आणि राज्यसभेत विरोधी पक्षही त्यांचे नेहमीच कौतुक करतात. अशावेळी मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे त्यांच्या विरोधात आहेत आणि म्हणून त्यांचा पत्ता साफ केला जाईल, अशा कपोलकल्पित कथा रचण्यात आल्या. एरव्ही अधूनमधून आपली नाराजी प्रकट करणार्या पंकजा मुंडे यांना बीडमधून उमेदवारी देत त्यांची अस्वस्थता दूर करण्याचा प्रयत्न झाला आहे. बहिणीच्या जागी मला उमेदवारी नको आहे आणि महायुतीमुळे धनंजय मुंडे यांना तेथील विधानसभा मतदारसंघ मिळाला आहे. पर्यायाने मला आता मतदारसंघच उरलेला नाही, अशा आशयाचे उद्गार पंकजा यांनी काढले होते. मला लोकसभेची उमेदवारी मिळू नये, अशी मीच प्रार्थना करत आहे, अशी भावना व्यक्त करणारे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांना चंद्रपूरमधून उमेदवारी देण्यात आली.प्रतिष्ठित अशा पुणे मतदारसंघातून उभे राहण्यासाठी भाजपचे सरचिटणीस सुनील देवधर, माजी शहरप्रमुख जगदीश मुळीक आणि माजी राज्यसभा खासदार संजय काकडे इच्छुक होते. परंतु, पुण्याचे महापौर राहिलेले मुरलीधर मोहोळ उमेदवारी मिळवण्यात यशस्वी झाले. गेल्या वर्षी कसबा विधानसभेच्या पोटनिवडणुकीत हेमंत रासने यांना उमेदवारी दिली गेली; पण त्यांचा पराभव झाला. म्हणून यावेळी मतपेढी सांभाळण्यासाठी देवधर यांना तिकीट दिले जाईल, असे मानले जात होते. २०१९ मध्ये पुण्यातून गिरीश बापट हे निवडून आले होते; परंतु मोहोळ हे कार्यकर्तृत्वामुळे पुण्यात लोकप्रिय आहेत.उत्तर मुंबई मतदारसंघातून गेल्यावेळी देशात दुसर्या क्रमांकाच्या मताधिक्याने गोपाळ शेट्टी निवडून आले होते; परंतु त्यांना डावलले असून, तेथून पीयूष गोयल यांना रिंगणात उतरवले आहे. साहजिकच शेट्टी नाराज झाल्यामुळे त्यांची समजूत काढण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना त्यांच्या भेटीस जावे लागले; परंतु शेट्टी हे निष्ठावंत असल्यामुळे ते समर्थकांचीही समजूत काढतील, असे सांगितले जाते. शिवाय राज्यसभेतून खासदार आणि मंत्री झालेल्या नेत्यांनीही रीतसर लोकसभेच्या मैदानात उतरून निवडून यावे, हे भाजपचे धोरण आहे. काँग्रेसमध्ये वर्षानुवर्षे १० जनपथची सेवा करून, म्हणजेच पक्षश्रेष्ठींची मर्जी राखून राज्यसभेवर जायचे, मागच्या दाराने मंत्री व्हायचे आणि शिवाय 'राष्ट्रीय नेते' म्हणून मिरवत राहायचे ही परंपरा आहे. गुलाम नबी आझाद, आनंद शर्मा, मुकुल वासनिक असे अनेक काँग्रेस नेते याच वाटेने मोठे झाले. परंतु, भाजपमध्ये नवी वाट निवडलेली दिसते. रावेरमधून रक्षा खडसे यांना पुन्हा उमेदवारी देण्यात आल्यामुळे त्यांचे सासरे एकनाथ खडसे हेदेखील पुन्हा भाजपमध्ये परततील, अशा चर्चा सुरू झाली आहे. महाराष्ट्रातील चार खासदारांना धक्का देण्यात आला, तर तीन माजी मुख्यमंत्र्यांना लोकसभेत उतरवले आहे. भाकरी फिरवून योग्य माणसांना योग्य ठिकाणी हलवायचे आणि त्यांच्या जागी नव्या लोकांना संधी द्यायची, ही रणनीती आहे. केंद्रीय मंत्री भारती पवार, हीना गावित यांनाही पुन्हा संधी दिली गेली असून, गेली पाच वर्षे प्रतीक्षेत असलेल्या प्रदेश उपाध्यक्ष स्मिता वाघ यांना जळगावची उमेदवारी मिळाली. महाराष्ट्रातील अनेक कर्तृत्ववान महिला या यादीत दिसतात.भाजपच्या दुसर्या यादीत देशातील एकूण १५ महिलांचा समावेश आहे. संसदेत घुसखोरी करणार्या तरुणांना पास देणार्या म्हैसूरमधील खासदार प्रताप सिंहा यांचे तिकीट रास्तपणे कापण्यात आले. सर्वसाधारणतः ज्यांची मतदारांमधील प्रतिमा आणि लोकप्रियता चांगली आहे आणि जे जिंकून येऊ शकतात, त्यांना उमेदवारी देण्याकडे भाजपचा कल आहे. ज्या राज्यांत भाजप मजबूत असूनही ज्यांचा गेल्यावेळी पराभव झाला होता, त्यांना संधी नाकारण्यात आली; परंतु तेलंगणासारख्या राज्यात ज्यांनी उत्तम लढत दिली, अशा गेल्यावेळच्या काही पराभुतांना लोकसभेत संधी देण्यात आली आहे. भाजपने दमदार उमेदवार देत पहिल्या टप्प्याची बांधणी केली आहे. पक्षापुढे मोठे आव्हान आहे ते आघाडीतील घटकपक्षांना सामावून घेत जागा वाटप करण्याचे. ते करतानाही काही कटू निर्णय घेण्याची तयारी पक्षाने ठेवल्याचे स्पष्ट झाले आहे. काँग्रेस आणि इंडिया आघाडीसमोर दमदार व्यूहरचना करून भाजप निवडणुकीतील समर्थ सत्ताधारी पक्ष म्हणून पुढे येताना दिसतो.

# कांशी तेरी नेक कमाई,किस किसने बेच के खाई

बहुजनांच्या म्हणजे मागासवर्गीय,ओबीसी,आदिवासी आणि अल्पसंख्याक समाजाचे राष्ट्रीय पातळीवर समर्थपणे नेतृत्व करेल अशी एक ही व्यक्ती आज राजकीय पातळीवर नाही.हा सर्व बहुजन समाज विविध पक्षात स्वार्थासाठी विभागला आहे, कोणती ही एक ठोस विचारधारा न मानणारा हा बहुजन समाज आज पुन्हा पुन्हा विखुरलल्या जात आहे.आणि त्यांच्यात प्रचंड असंतोष आहे. राज्यात व केंद्रात त्या त्या समाजांचे प्रतिनिधित्व आहे,पण ते स्वाभिमानी नाही,लाचार, गुलामगिरी पत्कारलेल वैचारिक दृष्ट्या अपंगत्व असलेलं आहे.मान्यवर कांशीरामजी यांनी ज्या विश्वासाने बहन मायावती यांच्या कडे बहुजन समाज पक्षाचे नेतृत्व दिले होते. ते कुठे तरी कमी पडले.आज उत्तर प्रदेशाच्या बाहेरच्या राज्यात कांशीराम जी सारखे पक्ष संघटन उभे करण्यास कमी पडते.त्याची सामिक्षा मान्यवर कांशीरामजी यांच्या ९० व्या जयंतीनिमित्त झाली पाहिजे. म्हणून हा लेख प्रपंच.

आज भारतात बहुसंख्य बहुजन समाजातील सर्व जाती मध्ये राजकीय स्पर्धा निर्माण झाली.ते निर्माण करणारे मान्यवर कांशीरामजी यांनी मागासवर्गीय समाजात प्रबोधन केले म्हणून झाली. त्यासाठी ते भारताच्या काश्मीर ते कन्याकुमारी पर्यत गावागावात फिरले.असा माणूस ज्याने ४००० हजार किलोमीटर सायकल चालवुन फुले,शाहू,आंबेडकरांचे विचारांचे प्रबोधन करून आंदोलन उभे करून यशस्वी राजकारण केले.व देशातल्या विमान आणि हेलिकॉप्टर मध्ये फिरून राजकारण करणाऱ्या नेत्यांना निवडणुकाद्वारे आपली ओळख निर्माण करून दाखविली,बहुजन समाजात आत्मविश्वास निर्माण केला. त्यामुळेच एक जोश पूर्ण घोषणा तयार झाली होती. कांशी तेरी नेक कमाई तुने सोती कोम जगाई मात्र आज या घोषणेचा अर्थ आणि सत्यपरिस्थिती पूर्ण बदलली आहे. बहुजन समाजातील जाणकार,राजकारणी काय म्हणतात कांशी तेरी नेक कमाई,किस किसने बेच के खाई मान्यवर कांशीराम यांनी खूप मेहनत करून मागासवर्गीय समाजाला बहुजन समाज म्हणुन संघटित केले त्यासाठी त्यांनी क्रांतिकारी घोषणा दिल्या.त्यामुळे समाजात प्रचंड प्रबोधन झाल्यामुळे परिवर्तन झाले.त्या त्या घोषणा सत्ता मिळविण्याच्या स्पर्धेत अर्थपूर्ण बदलल्या त्या घोषणा मुळे बहुजन समाजात जनजागृती झाली.त्याच घोषणांचा आज प्रत्येक मतदारसंघात बहुजन समाज म्हणजे आपला बिकाऊ गुलाम मतदार आहे.असा समज वरिष्ठ पक्ष नेतृत्वाला झाला आहे.जिसकी सांख्य भारी उतनी उसकी भागेदारी म्हणायचे आणि ज्याचा पैसे भारी त्याला उमेदवारी देऊन मतदार संख्येच्या हिशेबाने रोख रुपये घ्याचे,हा धंदा झाल्यामुळे बहुजन समाज पक्ष विचारधारे पासुन दूर गेला आहे.



जाती तोडो,समाज जोडो,सर्व जातीचा वैचारिक भाईचारा संपला,आता स्वार्थासाठी युती आघाडी होत आहे.बापाची पॉपर्टी समजून ज्यांनी २५ वर्ष राज्याचे अध्यक्ष पद भोगले त्याची सत्य परिस्थिति अशी आहे की तो समाजाला तोंड दाखव्याच्या लायकीचा राहील नाही. त्याने जे पेरले तेच उगवले आहे.राज्यातील एक कायदे तज्ञ देशातील तीन चार राज्याचे प्रभारी राहिले होते. देशातील प्रत्येक निवडणुकीतील मतदार संघातील आकडेवारी आणि टक्केवारी त्यांच्या तोंड पाठ होती.त्यामुळेच देशातील विचारवंत कायदे तज्ञ नेते म्हणून ते ओळखले जात होते.बसपा राष्ट्रीय पक्षात त्यांची कोणत्या पदावर कायदेशीर नोंदणी होती.हे त्यांना समजले तेव्हा त्यांनी स्वताचा राष्ट्रीय पक्ष काढला आणि २०१९ ला राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे वरळी विधानसभा उमेदवार म्हणून निवडणूक लढवली.हा इतिहास लिहला गेला आहे.म्हणूनच कांशी तेरी नेक कमाई,तुने सोती कोम जगाई!.हा संदेश देशात क्रांतीकरून गेला. आज या घोषणेचा अर्थ आणि सत्यपरिस्थिती पूर्ण बदलली आहे. बहुजन समाजातील जाणकार,राजकारणी काय म्हणतात कांशी तेरी नेक कमाई,किस किसने बेच के खाई झाला आहे.असो शेवटी इतिहास हा इतिहास असतो आणि तो लिहला जातो.

मान्यवर कांशीराम यांचा जन्म १५ मार्च १९३४ ला पंजाब राज्यातील मुक्काम पोस्ट खवासपूर जिल्हा रोपड येथे एका मागासवर्गीय रविदासीय म्हणजेच शीख चर्मकार समाजात झाला होता.त्यांच्या आईचे नांव बिशन कौर आणि वडिलांचे नांव हरिसिंग होते.रोपड येथील शासकीय महाविद्यालयात बी एस्सी पर्यत शिक्षण झाले होते.उच्च ऊर्जा पदार्थ संशोधन प्रयोग शाळा पुणे येथे नोकरीला लागले होते.१९६५ ला केंद्र सरकारने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १४ एप्रिल जन्म दिनाची सार्वजनिक सुट्टी रद्द करण्याचा आदेश काढला होता.त्या आदेशाच्या विरोधात भारत सरकारच्या सेवेत असणाऱ्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांनी आंदोलन सुरू केले होते.त्या आंदोलनात मान्यवर कांशीरामजी उच्च पदस्थ अधिकारी असून सुद्धा सहभागी झाले.तोच त्यांच्या जीवनातील क्रांतिकारी बदल होता.तिथूनच त्यांचा संघर्ष सुरू झाला.त्यांनी १९७८ साली त्यांनी ऑल इंडिया बॅकवर्ड अँड मायनॉरीटीज कम्युनिटीज एम्प्लेयईज फेडरेशन (बामसेफ) -श्रश्र खपवळर इरलज्ञुरीव रपव चळपीळीं ऊर्गींपळींळशी एाश्रिूशशी ऋशवशीरींळेप (इ-चउएऋ) स्थापना केली होती.६ डिसेंबर १९८१ साली त्यांनी दलित शोषित समाज संघर्ष समिती (डी एस-४) ची स्थापना केली.तेव्हा त्यांचा एक लोकप्रिय नारा होता. ब्राम्हण,ठाकूर,बनिया चोर है बाकी सब डीएस फोर है..१४ एप्रिल १९८४ बहुजन समाज पक्षाची स्थापना झाली.हर समस्या कि चाबी सत्ता होती है,म्हणनूच जिसकी जितनी संख्या भारी उसकी उतनी हिस्सेदारी व्होट हमारा राज तुमारा नही चलेगा,नही चलेगा!.न बिकणे वाला समाज बनविण्यासाठी त्यांनी चार हजार किलोमीटर सायकलवरून यात्रा कडून प्रबोधन केले.एक नोट एक व्होट,प्रयोग यशस्वी करून दाखविला.होऊ शकत नाही, म्हणणाऱ्यांना होऊ शकते हे करून दाखविले.सर्व समस्या ची ८५ बनाम १५ टक्के ची चाबी कुठे हरवली आहे.ती शोधण्याची इच्छाशक्ती आज राजकीय नेतृत्व करणाऱ्या मायावती यांच्यात राहिली नाही.या सर्व घटनाची प्रामाणिकपणे आत्मचिंतन परीक्षण किंवा समीक्षा करण्याची तयारी नेत्यांची नाही. म्हणून बहुजन समाज पहिल्या पेक्षा आता जास्त संघटनेत विभागला जात आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी पुणे करारावर प्रतिकीर्या देताना सांगितले होते कि संयुक्त मतदार संघ म्हणजे एक गलिच्छ उपनगर ज्या नगराचा उमेदवार ठरविण्याचा अधिकार उच्च वर्णीय लोकांना आहे.आणि त्याचा समाजाचा सत्यानाश करण्यासाठी वापर करने म्हणजेच मान्यवर कांशीरामजीच्या शब्दात चमचा.(आजचे राष्ट्रपती,लोकसभा सभापती,राज्यपाल ) चमचा हा घराघरात वापरल्या जाणारे हत्यार आहे.जे स्वत कोणतेही काम करू शकत नाही.पुणे करारा नंतर राजकारण्यांनी असेच चमचे मागासवर्गीय,असंघटित,कष्टकरी शोषित पीडित,आदिवाशी आणि अल्पसंख्याक समाजात निर्माण केले.चमचाचा वापर नेहमी आपल्या फायद्या साठीच होतो.त्यामुळे तो कोणाचे नुकसान स्वतः करीत नाही कोणाच्या सांगण्या वरून करतो.मान्यवर कांशीराम यांच्या बसपाची 'बहुजन हिताय बहुजन सुखाय घोषणा' जेव्हा मायावतीने 'सर्वजण हिताय,सर्वजण सुखाय' केली तेव्हा सत्ता आल्यावर चमचा आणि हत्यार कसे वापल्या जाते हे दिसून आले.बहन मायावती सत्ता चालविण्यास,समाजाच्या आणि राज्याच्या हिताचे निर्णय घेण्यास समर्थ होत्या.अनेक विद्यालयाला महाविद्यालयाला महापुरुषाच्या नांवे देऊन वैचारिक समाज क्रांती झाली पाहिजे होती.जिल्ह्याचे नांव सर्व महापुरुष संत महामाताच्या नांवे केले. त्यामुळे मागासवर्गीय समाजात विशेष चमार समाजात मोठा राजकीय दुष्टिने बदल अपेक्षित होता.पण काय बदल झाला?. हे कांशीरामजीचे तत्वज्ञान मायावतीने केवळ सत्ता मिळवण्यासाठी मातीमोल करून ठेवले असे बोलले जाते. हे आता सर्वच कॅडर बेस,बामसेफचे उच्चशिक्षित अधिकारी खाजगीत म्हणतात. त्यामुळे चमचा युग काय करू शकते २०१२ च्या नंतरच्या २०१४,२०१९ निवडणुकीतील मतदार संघातील आकडेवारी आणि टक्केवारी बहुजन समाजाला दाखवून दिले.मान्यवर कांशीराम यांच्या वेळी देशातील तीन चार नंबरचा राष्ट्रीय पक्ष आज कोणत्या नंबर वर आहे. त्याचे आत्मचिंतन परीक्षण समीक्षा बहुजन समाजातील बुद्धिजीवी, विचारवंत साहित्यिक यांनी बहुजन समाजाच्या हितासाठी केली पाहिजे.ती होतांना दिसते काय ?.



मुझे पढे लिखे लोगोने धोका दिया असे.डॉ बाबासाहेब आंबेडकर खेदाने मत व्यक्त केले होते.पण त्याच पढे लिखे लोकांना संघटीत करून मान्यवर कांशीरामजी यांनी बामसेफ संघटना बनविली आणि त्याच्या कडून सक्तीने आर्थिक मदत मिळविली त्यातूनच त्यांनी डीएस फोर उद्ध४ दलित शोषित समाज संघर्ष समिती द्वारे समाजात जनजागृती केली.त्याची सुरुवात ही सायकलवरून झाली. ते कार्यकर्त्यानां सांगत सायकल ही माझ्या साठी एकमात्र साधन आहे.ते केवळ साधनच नाही तर बहुजन मिशनचे सर्वात महत्वाचे साधन आहे.यावरच त्यांनी भारत भर सायकल यात्रा काढली.आज कार्यकर्त्यांच्या नेत्यांच्या घरी दोन,तीन,चारचाकी गाड्या आहेत तरी तालुका,जिल्हाभर फिरण्याची तयारी नाही.मान्यवर कांशीराम जी यांनी आपल्या पन्नास वर्षात बहुजन समाजात जनजागृतीसाठी चाळीस दिवसात चार हजार किलोमीटर सायकलवरून यात्रा केली. देशातील नव्हे तर जगातील कोणत्याही समाज सुधारक,राजकिय नेत्याने असे धाडस केले नाही.यात्रा काढणारे खूप आहेत पण त्यांच्या हजार किलोमीटर वर भूमिका बदलत राहतात.त्यामुळे त्यांचा इवेंट होतो प्रबोधन होऊन परिवर्तन होतांना दिसत नाही.

मान्यवर कांशीरामजी ने रात्र दिवस मेहनत करून वाढविलेली बसपा मायावतीने चमच्या लोकांच्या सल्ल्याने देश भरातील प्रथम कॅडर बेस कार्यकर्ते संपवले.मायावतीचे सर्व निर्णय अचूक असतील तर प्रत्येक राज्यात पक्ष संघटन का वाढत नाही यांची समीक्षा बैठक प्रामाणिकपणे झाली पाहिजे.कांशीरामजीने मायावतीवर जो विश्वास दाखविला त्याला तडा गेला आहे.मिशनरी कार्यकर्त्यांना चमचा समजून पक्षातुन बेदखल करून बसपाचे न भरून येणारे नुकसान झाले आहे.काही चमच्यांना त्याच्या समाजाच्या विरोधात उभे केले जाते.तर मिशनरी कार्यकर्त्यांना त्यांच्या समाजाच्या हिता साठी उभे केले जाते.चमचा आपल्यासमाजाच्या नेत्याला कमजोर बनवितो तर मिशनरी कार्यकर्ता आपल्या समाजातील सच्या नेत्याला मजबूत बनवितो.कांशीरामजीची संघटन कौशल्य आणि मायावतीचे संघटन कौशल्य यातील फरक आज प्रत्येक राज्यात दिसून येत आहे.गरीब प्रामाणिक,वक्तृत्व,कर्तृत्व आणि नेतृत्व करणाऱ्या कार्यकर्त्यांची आज पक्षाला गरज नाही.त्यामुळे तो बाहेर फेकल्या गेला आहे.काही कार्यकर्ते नोकरी धंदा करायला लागले. तर काही वैफल्यग्रस्त झाले आहेत.

महाराष्ट्र राज्याचा विचार केला तर लक्ष्मीपुत्र विलास गरुड यांनी एका ही तालुक्यात,जिल्ह्यात नेतृत्व निर्माण होऊ दिले नाही.एकाही विधानसभा,लोकसभा मतदारसंघात उमेदवार हक्क सांगेल असा नेता निर्माण होऊ दिला नाही.मुलगा तरुण झाला,सुशिक्षित झाला म्हणून आईवडीलानां घराच्या बाहेर काढत नाही,वेळोवेळी त्यांचा मानसन्मान ठेऊन सल्ला घेतच असतो.पक्षात माजी अध्यक्ष झाला तर नवीन अध्यक्षांनी त्याला सोबत ठेऊ नये त्याला कोणत्याही कार्यात सहभागी होऊ देऊ नये, ही पद्धत आज खुद्द गरुड बाबत वापरली जात आहे. म्हणजे निसर्गाचा नियम आहे,जे पेरले तेच उगवते. जे विचारधारा मानणारे कॅडर बेस कार्यकर्ते असतात ते कोणत्याही परिस्थितीत दुसऱ्या पक्षात जाऊ शकत नाही.आणि गेले तर जास्त दिवस टिकू शकत नाही.एक वेळ पक्ष बदलला तर त्यांना समाजात काम करता येत नाही.मग ते सामाजिक,धार्मिक शैक्षणिक सांस्कृतिक कार्या कडे वळतात.तिथे ही त्यांना सारखा वैचारिक संघर्ष करावा लागतो.बहुजनांच्या म्हणजे मागासवर्गीय,ओबीसी,आदिवासी आणि अल्पसंख्याक समाजाच्या कोणत्याही मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पक्ष व पक्षांचे कार्यकर्ते जनांदोलन करून न्याय मिळवून देण्यासाठी काम करत नसतील तर त्यांना निवडणूकीत मतदान मागण्याचा काय अधिकार आहे.

महापुरुषांच्या नांवावर मत मागायचे तर त्यांनी ज्या असंघटित कष्टकरी मागासवर्गीय,ओबीसी,आदिवासी आणि अल्पसंख्याक समाजाला सहा मूलभूत अधिकार मिळवून दिले अन्न,वस्त्र,निवारा,शिक्षण,रोजगार आणि आरोग्य त्याबाबत पक्षाच्या वतीने कोणतेच काम होत नाही. राज्य व केंद्रांच्या अनेक योजना या बहुजन समाजाला मिळत नाहीत.उच्चवर्णीय सरकारी अधिकारी आणि उच्चवर्णीय शासन मान्यता असलेले ठेकेदार बहुजन समाजाचे मुक्त शोषण करतांना दिसतात.त्यातही राजकीय चमच्याची रोजीरोटी यांचे आर्थिक शोषण करूनच चालते.त्यावर महापुरुषांच्या विचारांचा वारसा सांगणारा पक्ष कोणत्या ही ठोस कृती कार्यक्रम राबवीत नाही.बहुजनांनी म्हणजे मागासवर्गीय,ओबीसी,आदिवासी आणि अल्पसंख्याक समाजानी बसपाचा मतदार का राहावा आणि बसपाला मतदान का करावे?.यांचे अभ्यासपूर्ण आत्मचिंतन झाले पाहिजे.मान्यवर कांशीराम यांनी जागी केलेली कोम (बहुजन समाज) पुन्हा पुन्हा दिशाहीन होऊन का झोपतो.त्याची चिकित्सा झाली पाहिजे.त्यासाठी कांशी तेरी नेक कमाई तुने सोती कोम जगाई या घोषणाचा मान्यवर कांशीराम यांच्या ९० व्या जयंती दिनी बहुजन समाजाला विसरता येणार नाही.मान्यवर कांशीराम यांच्या क्रांतिकारी विचारांना व प्रतिमेला त्रिवार वंदन आणि बहुजन समाजास जयंतीनिमित्त हार्दिक शुभेच्छा.

******

सागर रामभाऊ तायडे –
९९२०४०३८५९
,भांडुप,मुंबई.

# हळदविधी की उधळपट्टी !

विवाह संस्काराचा प्रारंभ मुलास हळद लावण्याने होतो. त्याची आई, बहिण व नात्यातील बायका त्याला सुगंधी तेलात भिजविलेली हळद लावतात. ह्या रंगतदार समारंभात हळदीची गाणी आणि वाजंत्री यासह मुलास समारंभपूर्वक आंघोळ घालतात. उर्वरित म्हणजे उष्टी हळद, साडी आणि पूजा साहित्यासह, वधूगृही नेतात. वरपक्षाकडे ज्याप्रमाणे हळदीचा कार्यक्रम झालेला असतो त्याचीच वधूकडे पुनरावृत्ती करतात. वधूला हळद लावतांना नारळ व पाच मूठभर तांदळांनी तिची समारंभपूर्वक ओटी भरतात. हळद लावल्यावर मुला-मुलीस नवरदेव-नवरी असे संबोधिले जाते. आजकाल ग्रामीण भागात होणाऱ्या लग्नांमध्ये एक नवीन विधी उदयास आला आहे, तो म्हणजे हळदी विधी. हळदी समारंभात हजारो रुपये खर्च करून विशेष सजावट केली जाते, त्या दिवशी वधू किंवा वर विशेष पिवळे कपडे घालतात. २०२० पूर्वी या हळदी विधीची प्रथा ग्रामीण भागात कुठेही दिसून येत नव्हती, मात्र गेल्या दोन-तीन वर्षात ग्रामीण भागात ही प्रथा झपाट्याने वाढली आहे.

पूर्वी हळदी विधीच्या मागे कोणताही दिखावा नव्हता, उलट त्यामागे तर्क होता. पूर्वी ग्रामीण भागात आजच्यासारखे साबण आणि शॉम्पू नव्हते, ब्युटी पार्लरही नव्हते. त्यामुळे वधू-वरांच्या चेहऱ्यावरील आणि शरीरावरील मृत त्वचा आणि केस हळदीच्या पेस्टने रगडून काढण्यासाठी आणि चेहरा मुलायम आणि चमकदार करण्यासाठी हळद, चंदन, मैदा आणि दुधापासून तयार केलेल्या पेस्टचा वापर केला जातो. जेणेकरून वधू-वर सुंदर दिसतील. या कामाची जबाबदारी कुटुंबातील महिलांची होती, पण आजकाल हळदीचा विधी बदललेला, दिखाऊ आणि महाग झाला आहे. ज्यामध्ये हजारो रुपये खर्चून सजावट केली जाते. महागडे पिवळे कपडे घातले जातात, वर वधूच्या घरी जातो आणि संपूर्ण वातावरण आणि कार्यक्रम पितांबरी करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला जातो. हे पिवळे नाटक घरच्या प्रमुखांच्या कपाळावर तणावाच्या रेषा काढते, ज्यामुळे चिंताग्रस्त घामाचे थेंब पडतात. जुन्याकाळी वधू-वर कच्च्या छपराखाली कसलाही गाजावाजा न करता भक्कम इराद्याने आपले जीवन आनंदाने सुरू करायचे, पण आज भक्कम हेतू कमी आणि ढोंग आणि कृत्रिमता जास्त आहे. आजकाल ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या कुटुंबातील मुलेही या शहरी कृत्रिमतेत अडकून कुटुंबावर अतिरिक्त आर्थिक बोजा वाढवत असल्याचे दिसून येत आहे. कारण त्यांना त्यांची ताकद त्यांच्या उदार मतवादी नेत्यांना, वन साईड हेअर कटिंगवाले किंवा लांब केस असलेल्या सिगारेट ओढणारे मित्रांना आपले शोऑफ दाखवायचे असते. इन्स्टाग्राम, फेसबुक इत्यादीसाठी रील बनवायची आहे. मुलाच्या रील बनविण्याच्या नादात वडिलांची कर्ज फेडण्यातच रील ऐवजी रेल बनून जात असते.


ग्रामीण भागात अशा घरांमध्ये फालतू खर्चावर पाण्यासारखा पैसा वाया जातो. ज्यांच्या आई-वडिलांनी एक-एक पैसा कमावून घराची रचना केली, पण ही तरुण मुले-मुली समजून न घेता पालकांच्या विरोधात जाऊन विनाकारण खर्च करतात. ज्या कुटुंबांची आर्थिक परिस्थिती चांगली नाही अशा मुलांनी त्यांच्या पालकांकडे आग्रह धरू नये आणि त्यांना अनावश्यक खर्च करायला लावू नये. आजकाल अनेक ठिकाणी असेही पाहायला मिळते की ज्यांचे लग्न आहे अशी मुलं ते त्यांच्या पालकांना सांगतात की, तुम्हाला काहीच कळत नाही, तुम्हाला समज नाही, तुमची विचारसरणी तशीच जुनी अशिक्षित राहणार आहे, तुम्ही असंस्कृत आहात असे म्हणत ते आपल्या आई-वडिलांना गवांर आणि मागासलेले म्हणतात. जेव्हा जेव्हा मी असे ऐकतो तेव्हा मला विचार करण्यास भाग पाडले जाते आणि माझे पाय अस्थिर होतात. माझे तरुण आणि धाकटे बंधू-भगिनी कोणत्या दिशेने जात आहेत, याची मला खूप काळजी वाटते. अशा फालतू कर्मकांडाला आळा बसल्याच्या बातम्या वाचून आनंद होतोच, पण लोक आपल्या घरात, कुटुंबात, समाजात, गावात अशा कार्यक्रमात सहभागी होऊन, त्यांचे फोटो क्लिक करून स्टेटस पोस्ट करून आनंद घेत आहेत.

***************

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# टीनेजर्स मुलं आणि आईवडील यांच्यात संघर्ष का होतो?

'आई, मी आले गं कॉलेज मधून, भूक नाही मला अजिबात', प्रणाली घरात आल्या आल्या आईला म्हणाली. आई जणू ती घरात शिरण्याचीच वाट पाहत होती. ती तरातरा प्रणालीच्या खोलीत आली आणि म्हणाली, 'आज तुझे कपाट आवरले मी'. प्रणाली जागीच उभी राहिली आणि अचानक आईवर चिडली. 'तू का हात लावलास माझ्या कपाटाला? मी मला हवे तेव्हा कपाट आवरेन नाही तर नाही आवरणार ! काय फरक पडतो? कोण बघायला येणार आहे माझे कपाट'? आईही चिडली. म्हणाली, 'मी आई आहे तुझी. कॉलेजमध्ये जातेस म्हणजे काही फार मोठी झाली नाहीस! किती पसारा होता! कपडे नुसते कोंबून भरलेले! तो एक क्रॉप टॉप कधी आणलास? मी बघितलेला नाही तो कधी! आणि एक ग्रीटिंग कार्ड मिळाले. अभिजीतने दिलेले. कोण हा? लाल गुलाबांचे चित्र आहे कार्डावर ! काय चाललंय काय? आम्ही लाड करतो म्हणून काय झालं? आपलं वागणं स्वच्छ हवं. समजलं'? प्रणाली आणखीच चिडली आणि आई मुलीच्या वादाला तोंड फुटले. प्रणालीच्या मते एक मुलाने ग्रीटिंग कार्ड दिल्याने काही फरक पडत नाही. ती म्हणाली त्याप्रमाणे तिचा त्या मुलाशी काही संबंध नाही. दुसरे आईने तिला त्यावरून 'जज' करू नये.. तसेच प्रणालीला वाटले क्रॉप टॉप एखादेवेळेस मैत्रिणींबरोबर घालायला काय हरकत आहे? आई म्हणजे फारच जुनाट कल्पना बाळगते! काकूबाईसारखे कपडे घातले तरच मुलीचे वागणे बरोबर का?'कुठून आलास? किती वाजले? काही ताळतंत्र आहे की नाही? बारावीचे वर्ष आहे! अभ्यास कधी करायचा? नुसत्या उनाडक्या करायला हव्यात! कोण तुझे मित्र आहेत बघू तरी देत! परवा तुम्ही सगळे कोपऱ्यावर उभे होतात, ते पाहिले मी. एक जण तर चक्क सिगरेट फुंकट होता! तुझे काय'? बाबा नुसते जाब विचारत होते. शंतनू जाम वैतागला. बाबा, 'माझ्यावर थोडा विश्वास ठेवलात तर बरं होईल. मी सिगरेट ओढत नाही. आईने तर चक्क जोरात श्वास घेतला. मी घरात आल्यावर सिगरेटचा वास येतो आहे का हे पाहायला! मी रोज देवाला नमस्कार करत नाही, मला त्याची गरज वाटत नाही; याचा अर्थ सिगरेट पिणे मला चालते, आवडते असे नाही ना! मला विचारलेत का, काही प्रॉब्लेम होता का? सांगून काही फायदा नाही म्हणा! अभ्यास मी करतो. पण याच्यावर तरी तुमचा कुठे विश्वास आहे? आईवडिलांना आपल्या मुलांमधले अनेक बदल डोळ्यासमोर दिसत असतात. आपल्या मुलाला मिसरूड फुटली



आहे, आवाजात बदल झाला आहे हे पाहून एकीकडे छान वाटते, तर एकीकडे आपला मुलगा बिघडणार तर नाही ना अशी भीती वाटू लागते. घरातल्या एखाद्या लग्नाच्या वेळेस आपली मुलगी छान नटली, जरा मेकअप केला तर आई मनात खूश होते आणि दुसरीकडे 'अरे बाप रे, आता जपायला हवे हिला! आपले चारित्र्य सगळ्यात महत्त्वाचे, हे कळेल ना तिला?' अशी चिंता वाटते. आता मुले अनेक प्रश्न उपस्थित करतात. घरातल्या पद्धती, रूढी पाळायला विरोध करतात. 'बरोबर- चूक' च्या व्याख्या मान्य करतातच असे नाही. 'माझी इच्छा, माझे मत' हे त्यांना अधिक महत्त्वाचे वाटू लागते. मित्रमंडळींचा, त्यांच्या आचार विचाराचा जास्त प्रभाव पडतो. मग आपला मुलगा/ मुलगी 'बंडखोर' झाली असे वाटते.मुलांची शारीरिक, मानसिक, भावनिक, वैचारिक, बौद्धिक आणि सामाजिक वाढ होत असते आणि पालकांना त्या बदलांचा स्वीकार करत करत आपल्या मुलांचे वागणे योग्य राहील, ती आत्मविश्वासाने समाजात वावरतील, आपल्या भविष्याविषयी निर्णय घेऊ शकतील आणि योग्य दिशेने त्यांचा विकास होईल या साठी प्रयत्न करावे लागतात.ज्या प्रेमाने आपण लहानपणापासून मुलांशी वागलो, त्याच प्रेमाने आणि मायेने आता आपला मुलगा/ मुलगी पौंगंडावस्थेत असतानाही आपल्याला वागायचे आहे. आपल्या मुलावर विश्वास ठेवायचा आहे. पण त्याचबरोबर त्याचे वागणे योग्य आहे ना याकडे लक्षही ठेवायचे आहे. या वयात मुलांना आपले मत असते, त्यामुळे कोणताही निर्णय करताना, मग तो गाडी/स्कूटर कुठली घ्यायची असा महत्त्वाचा निर्णय घेतानाही मुलांशी चर्चा करावी. एखाद्या निर्णयात त्यांना पर्यायांचा विचार करायला प्रवृत्त करावे. योग्य काय, अयोग्य काय हे ठरवण्याचे स्वातंत्र्य जरूर द्यावे, त्यासाठी आधी आपले मत काय आहे, ते का तसे आहे आहे, इतर मते काय काय असू शकतात अशी सगळी चर्चा केली की मुलांना आपल्या मताचेही महत्त्व समजते.समाजाला अपेक्षित असलेले सगळे संकेत आपला मुलगा/ मुलगी पाळेल असे नाही, घरात पाहुणे आले तरी आपली मुलगी गाणी ऐकत बसते आणि त्यांच्याशी विशेष बोलत नाही, हे कदाचित आपल्याला सहन करावे लागते. काही मर्यादा घालून दिल्या आणि त्या आग्रहाने पण न रागावत पाळल्या तर आपोआप मुले आपल्याशी सहकार्य करतात. उदा. पाहुणे आल्यावर त्यांच्याशी ओळख देऊन, त्यांनी आपल्याला विचारलेल्या दोन प्रश्नांना उत्तर देऊन मग गाणी ऐकायला जावे, असा नियम सहज पाळता येण्यासारखा आहे. जर असे नाही वागले, तर पाहुण्यांच्या समोर न रागावता, नंतर आपली नापसंती स्पष्ट शब्दात व्यक्त करावी. आपली काय अपेक्षा आहे आणि का आहे हे ही स्पष्ट करावे.आपला मुलगा अभ्यास करतो ना, अशी सतत शंका बाळगण्यापेक्षा त्याच्या अभ्यासाची दर काही दिवसांनी विचारपूस करावी, त्याचे वेळापत्रक काय आहे हे माहीत करून घ्यावे. आपल्या असे लक्षात आले, की तो पुरेसा अभ्यास करत नाही आहे, तर त्याला हा 'फीडबॅक' नक्की द्यावा, आपली अपेक्षा काय ते सांगावे आणि त्याच्याशी चर्चा करून काही उद्दिष्ट ठरवावे. आपल्या आईचा असा दृष्टिकोण, सारखे जाब न विचारता विश्वासाने वागणे याचा चांगला परिणाम होतो आणि आईची 'कटकट' वाटत नाही.आपल्या मुलाला या काळात मित्र सगळ्यात महत्त्वाचे असतात. सहजपणे त्याच्या मित्रांची चौकशी करणे, त्यांची मते जाणून घेणे, प्रत्येक गोष्टीवर टीका न करणे हे मुलांचा विश्वास संपादन करायला फार आवश्यक. आपल्या मुलांवर काही ना काही जबाबदारी टाकणेही आवश्यक! त्यातून त्याचा आत्मविश्वास वाढतो. या सगळ्यात मुलांबरोबरचा संवाद महत्त्वाचा ठरतो. पालक आणि मुले यांच्यातले सुदृढ नाते हा संघर्षमय किशोरवयाचा काळ पार पाडायला मदत करते.

## शरिरीक वेदनांपासून ते मानसिक आरोग्य सुधारण्यापर्यंत.. मयूरासन आहे फायदेशीर, जाणून घ्या योग्य पद्धत

शरीर निरोगी ठेवण्यासाठी योगा अतिशय फायदेशीर आहे. लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्व वयोगटातील व्यक्ती योगा करू शकतात. शारिरीक आणि मानसिक आरोग्यासाठी योगा अतिशय प्रभावी आणि फायदेशीर आहे.योगामुळे आपल्या शरीराला आंतरिक ऊर्जा मिळते आणि शारिरीक समस्यांपासून आराम देखील मिळतो. योगामध्ये विविध प्रकारची योगासने आहेत. या योगासनांचे फायदे देखील अनेक आहेत.या योगासनांपैकीच एक असलेले आसन म्हणजे मयूरासन होय. या योगासनाचा नियमित सराव केल्याने अनेक शारिरीक आणि मानसिक आजारांपासून आपल्याला आराम मिळतो. शिवाय, पोटाशी संबंधित असलेल्या आजारांपासून देखील आराम मिळतो. मयूरासन योगासन केल्याने पोटाच्या समस्येसोबतच, शारिरीक आणि मानसिक समस्या दूर होण्यास मदत होते.आज आपण हे मयूरासन करण्याची योग्य पद्धत कोणती? आणि या योगासनाचा नियमित सराव केल्याने होणारे फायदे कोणते आहेत? ते जाणून घेणार आहोत.हे योगासन करताना आपल्या शरीराची स्थिती ही मोरासारखी दिसते. हे योगासन करायला अवघड जरी असले तरी त्याचे अनेक फायदे आहेत. त्यामुळे, या योगासनाचा सराव हा तज्ज्ञांच्या देखरेखीखाली करावा.मयूरासन करताना सर्वात आधी योगा मॅटवर गुडघे टेकवून बसा. त्यानंतर, तुमचे दोन्ही हात जमिनीवर ठेवा.आता दोन्ही हातांची बोटे पाठावर ठेवून पाय जवळ ठेवण्याचा प्रयत्न करा.त्यानंतर, तुमचे दोन्ही हात गुडघ्यांमध्ये ठेवा आणि हाताचे कोपर पोटावर व्यवस्थितरित्या सेट करा.आता तुमचे दोन्ही पाय मागे न्या आणि सरळ रेषेत ठेवा. त्यानंतर, तुमचे शरीर पुढे वाकवताना शरीराचा संपूर्ण भार दोन्ही हातांवर आणण्याचा प्रयत्न करा.आता हातांवर संतुलन साधताना शरीर वरच्या दिशेने खेचण्याचा प्रयत्न करा.या स्थितीमध्ये तुमचे हात केवळ जमिनीला समांतर असतील बाकी तुमचे संपूर्ण शरीर हवेत असेल.तुमच्या क्षमतेनुसार तुम्ही या योगासनात जास्त वेळ राहू शकता. त्यानंतर, पुन्हा सामान्य स्थितीमध्ये या.मयूरासनाचे फायदे कोणते ?हाडांच्या बळकटीसाठी तुम्ही मयूरासनाचा सराव करू शकता. या योगासनामुळे खांदे, कोपर, मनगट आणि पाठीचा कणा मजबूत होण्यास मदत होते.या योगासनाचा नियमित सराव केल्याने पचनक्षमचा सुधारते आणि पोटाच्या समस्या दूर होण्यास मदत होते.मधुमेहींसाठी मयूरासन हे योगासन लाभदायी आहे. कारण, या योगासनाचा सराव केल्याने रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित राहते.

## किडनीतुन विषारी घटक बाहेर फेकण्यासाठी 'हे' ५ पदार्थ ठरतात सुपरफूड; शाकाहारी व मांसाहारी, दोन्ही पर्याय वाचा

दरवर्षी मार्चच्या दुसऱ्या गुरुवारी, 'जागतिक किडनी दिन' साजरा केला जातो. मागील काही काळात जीवनशैलीतील बदलांमुळे किडनी फेल होण्याचे प्रमाण वाढत असताना किडनीच्या आरोग्यासाठी जनजागृती करणे महत्त्वाचे ठरत आहे. आपल्या शरीराचा फिल्टर अशी ओळख असलेला मूत्रपिंड हा अत्यंत महत्त्वाचा अवयव आहे. आपल्या रक्तातील टाकाऊ पदार्थ शांतपणे फिल्टर करणे, इलेक्ट्रोलाइट्स संतुलित करणे आणि संपूर्ण आरोग्यासाठी आवश्यक हार्मोन्स तयार करणे ही जबाबदारी या अवयवावर असते. आज घडीला जगभरात लाखो लोक क्रॉनिक किडनी डिसीजने ग्रस्त आहेत. २०२२ मध्ये जर्नल किडनी इंटरनॅशनल सप्लीमेंट्समध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार, जगभरातील लोकसंख्येच्या सुमारे १० टक्के लोकांना (८०० दशलक्ष) मूत्रपिंडाचा आजार आहे. किडनी सुदृढ राहावी यासाठी कोणतीही जादूची गोळी नसली तरी, तुमच्या आहारात काही सुपरफूड्सचा समावेश केल्याने तुमच्या किडनीची सक्षमता वाढू शकते. डॉ प्रकाश चंद्र शेट्टी, डॉ एल एच हिरानंदानी हॉस्पिटल, पवई, मुंबई येथील यूरोलॉजिस्ट आणि डॉ मंजू अग्रवाल, मुख्य- वैद्यकीय सेवा आणि नेफ्रोलॉजी, आर्टेमिस हॉस्पिटल गुरुग्राम येथील नेफ्रोलॉजिस्ट, यांनी किडनीचे आरोग्य वाढवण्यासाठी इंडियन एक्सप्रेसच्या लेखात ५ सुपरफूड्सची यादी नमूद केली आहे.ब्लूबेरीमध्ये भरपूर जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात, तसेच या लहानश्या फळातील अँथोसायनिन्ससारखे अँटिऑक्सिडंट जळजळ कमी करतात आणि ऑक्सिडेटिव्ह तणावापासून संरक्षण करतात. या बेरींमध्ये सोडियम, पोटॅशियम आणि फॉस्फरस देखील कमी असतात, ज्यामुळे ते मूत्रपिंडाच्या समस्या असलेल्या व्यक्तींसाठी पूरक बनतात. तुमच्या आहारात ब्लूबेरीचा समावेश केल्यास रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास आणि किडनी स्टोनची वाढ रोखण्यास मदत होऊ शकते.रावस मासा ओमेगा -३ फॅटी ऍसिडचा मुबलक साठा असलेला रावस मासा हा आपल्या दाहक-विरोधी गुणधर्मांमुळे हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आरोग्यासाठी फायद्याचा ठरतो. रावस माशाच्या सेवनाने कोलेस्टेरॉलची पातळी



कमी होते, त्यामुळे परिणामी किडनीच्या आजाराचा धोका सुद्धा कमी होतो. याव्यतिरिक्त, रावस प्रथिनांचा उत्तम स्त्रोत आहे, जो आरोग्य आणि स्नायूंच्या कार्यासाठी आवश्यक अमीनो ऍसिड प्रदान करण्याचे सुद्धा काम करतो.केल पालकासारखेच दिसणारे केल हे साधारणतः सॅलेडमध्ये किंवा सँडविच, सब रोल मध्ये वापरले जाते. यामध्ये जीवनसत्व, खनिजे व अँटिऑक्सिडंट्सचा साठा असतो. रक्त गोठणे, किंवा ठिसूळ हाडे यांवर केल परिणामकारी उपाय ठरू शकतो. यामध्ये पोटॅशियमचे प्रमाण कमी असल्याने मूत्रपिंडाचा आजार असलेल्यांसाठी हा उत्तम पर्याय आहे. तुमच्या दैनंदिन आहारात केलचा समावेश केल्याने किडनीच्या कार्यात मदत होऊ शकते.लसूण लसूणमध्ये लिसिन असते, ज्यामुळे बॅक्टेरियाच्या वाढीस आळा बसून जळजळीचे प्रमाण कमी होऊ शकते. लसणाचे नियमित सेवन केल्याने रक्तदाब कमी होतो. तसेच कोलेस्टेरॉल नियंत्रणात आल्याने हृदयविकारांपासून बचाव होतो आणि मूत्रपिंडांचे संरक्षण होते.क्विनोआ ग्लूटेन-मुक्त संपूर्ण धान्य असलेला क्विनोआ इतर आवश्यक पोषक तत्वांसह प्रथिने, फायबर, लोह आणि मॅग्नेशियमचा समृद्ध स्त्रोत आहे. क्विनोआमध्ये पोटॅशियम आणि फॉस्फरसचे प्रमाण कमी असते, ज्यामुळे ते किडनीच्या समस्या असलेल्या व्यक्तींसाठी फायदेशीर ठरतात. क्विनोआमधील उच्च फायबर रक्तातील साखरेची पातळी स्थिर करण्यास मदत करते आणि पचनास प्रोत्साहन देते. इतर कार्ब्स ऐवजी क्विनोआला तुमचा प्राथमिक उर्जा स्त्रोत बनवल्यास किडनीच्या आरोग्याला मदत होऊ शकते.यासह डॉ. शेट्टी असेही सांगतात की, तुमच्या मूत्रपिंडातून विषारी आणि टाकाऊ पदार्थ बाहेर काढण्यासाठी पाणी आवश्यक आहे. तुमची जीवनशैली व हवामानानुसार दररोज किमान आठ ग्लास पाणी पिण्याचे लक्ष्य ठेवा. रिफाईंड साखर व सोडियमचे सेवन सुद्धा मर्यादित असावे. गरज भासल्यास आपण वैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला आवर्जून घ्यावा.

## 'या' परफेक्ट फॉर्म्युल्यामुळे झपाट्याने होऊ शकते वजन कमी; तज्ज्ञांचा कोणता फंडा येईल तुमच्या कामी, जाणून घ्या



वाढते वजन ही आजच्या युगातील सर्वात मोठी समस्या आहे. खराब आहार आणि बैठी जीवनशैली वजन वाढण्यास कारणीभूत आहे. वाढत्या वजनामुळे तुम्ही मधुमेह, रक्तदाब यांसारख्या अनेक आरोग्य समस्यांना बळी पडू शकता. वजन कमी करण्यासाठी लोक डायटिंग करतात किंवा तास न् तास जिममध्ये घाम गाळतात, परंतु तरीही वजन कमी होत नाही, कारण त्यांचा डाएट चार्ट योग्य नसतो. आहाराकडे योग्य लक्ष आणि थोडासा व्यायाम केल्याने वजन लवकर कमी करणे शक्य आहे. झपाट्याने वजन कमी करण्यासाठी कोणता फंडा तुमच्या कामी येईल, याविषयी आरोग्यतज्ज्ञ डॉ. मिकी मेहता यांनी माहिती दिली असल्याचे वृत्त द इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे, त्याबद्दल सविस्तर माहिती जाणून घेऊ.

## 'बारावी फेल' सर्वोत्कृष्ट चित्रपट; विक्रांत सर्वोत्कृष्ट अभिनेता

मुंबई : क्रिटिक्स चॉईस पुरस्कार सोहळा चैतन्यमय आणि जोशपूर्ण वातावरणात पार पडला. वांद्रे-कुर्ला संकुलातील एका पंचतारांकित हॉटेलात हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.यावेळी विधू विनोद चोप्रा यांच्या 'बारावी फेल' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा बहुमान मिळाला. अभिनेता अनिल कपूरच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. या वेळी विधू विनोद चोप्रा म्हणाले, समीक्षकांच्या नजरेतून हा चित्रपट सर्वोत्कृष्ट चित्रपट ठरला, याचा मला आनंद होत आहे. मी सगळ्यांचा आभारी आहे. या वेळी ज्येष्ठ संगीतकार उषा खन्ना यांना संगीत क्षेत्रातील अमूल्य योगदानाबद्दल पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. सर्वोत्कृष्ट अभिनेता म्हणून 'बारावी फेल' चित्रपटासाठी विक्रांत मेस्सीला तर, सर्वोत्कृष्ट अभिनेत्री म्हणून शेफाली शहा (थ्री ऑफ अस) गौरवण्यात आले.



सर्वोत्कृष्ट वेबसीरिजचा मान 'कोहरा' या सीरिजला मिळाला. तसेच वेबसीरिज विभागातील सर्वोत्कृष्ट अभिनेता सुविंदर विक्की (कोहरा) आणि सर्वोत्कृष्ट अभिनेत्री राजश्री देशपांडे (ट्रायल बाय फायर) यांना गौरविण्यात आले. 'कॉफी विथ करण'साठी सगळ्यात लोकप्रिय कार्यक्रम म्हणून करण जोहरला गौरविण्यात आले. डिस्ने हॉट स्टारला सर्वोत्कृष्ट ओटीटी प्लॅटफॉर्म म्हणून पुरस्कार देण्यात आला.या सोहळ्याला अनेक तारे-तारकांनी हजेरी लावली होती. त्यामध्ये करण जोहर, विद्या बालन, किरण राव, मौसमी चॅटर्जी, अनिल कपूर, सिद्धार्थ रॉय-कपूर, मीनाक्षी शेषाद्री, विक्रमादित्य मोटवानी, श्रिया पिळगावकर, कोंकणा सेन शर्मा, अमृता सुभाष, दिव्या दत्ता, कबीर खान, अली फजल, रिचा चड्ढा, स्मिता तांबे, सोनाली कुलकर्णी आदी हिंदी व मराठी चित्रपटसृष्टीतील मंडळींचा समावेश होता.

## महाराष्ट्रात पान मसाल्यावर बंदी कायम

मुंबई : उत्तर प्रदेश सरकारला नसेल पण महाराष्ट्र सरकारला इथल्या नागरिकांच्या आरोग्याची चिंता आहे. त्यामुळे आम्ही पान मसालावरील बंदी उठवू शकत नाही, अशा शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने पान मसाला विक्री करणा-या कंपनीला कोणताही दिलासा देण्यास नकार दिला आहे. पान मसाला विक्री करणा-या एका कंपनीच्या वतीने करण्यात आलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती फिरदोश पुनीवाला यांच्या खंडपीठाने रजनीगंधा या पान मसाल्यावरील राज्यातील बंदी उठवण्याची मागणी फेटाळून लावली आहे.याचिकाकर्त्यांची कंपनी ही उत्तर प्रदेशातील नोएडामध्ये असून तिथं पान मसालावर कोणतीही बंदी नसल्याचा दावा करून ही बंदी उठवावी अशी मागणी हायकोर्टाकडे करण्यात आली होती. मात्र, तंबाखूजन्य पदार्थांमुळे होणा-या कॅन्सरवर उपचारांसाठी युपीतील नागरिकही मुंबईतील टाटा रुग्णलायात येतात. त्यामुळे पान मासालावरील बंदी योग्यच असल्याचा दावा राज्य सरकारकडून करण्यात आला होता.याचिकेत काय म्हटले होते? अन्न व औषध प्रशासनाने १८ जुलै २०२३ मध्ये परिपत्रक जारी करत राज्यभरात गुटखा, सुगंधी पान मसाला व तत्सम तंबाखूजन्य पदार्थांवरील बंदी वर्षभरासाठी कायम ठेवली होती. या आदेशानुसार वर्षभराच्या कालावधीसाठी उत्पादकांना तंबाखू आणि सुपारीची साठवणूक, वितरण, वाहतूक तसेच विक्री करण्यास प्रतिबंधित करते. या निर्णयाविरोधीत रजनीगंधा पान मसाला कंपनीच्यावतीने मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. आमचा तंबाखूजन्य पदार्थांशी संबंध नसल्याने आपण पान मसाला आणि सुगंधी सुपारी विक्रीवरील बंदीला आव्हान दिल्याचे त्यांनी या याचिकेतून म्हटले होते. अन्न आणि सुरक्षितता विभागाच्या आयुक्तालयाकडून याचिकाकर्त्यांना पान मसाल्याची विक्री तथा उत्पादन करण्याचा परवाना मिळाला होता. परंतु, अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने तो रद्द केला. मुळात परवाना रद्द करण्याचा प्राधिकरणाला अधिकारच नाही, त्यांनी घातलेली बंदी ही कायदा आणि नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन करणारी आहे असा दावा करण्यात आला होता. गुटखा बंदी करणारे महाराष्ट्र पहिले राज्य अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने मात्र प्रतिज्ञापत्राद्वारे या याचिकेतील सर्व आरोपांचे खंडन केले. साल २०१२ मध्ये राज्य सरकारनं लावलेली पान मसाला आणि तत्सम तंबाखूजन्य पदार्थांवरील बंदी अद्यापही कायम आहे. राज्य सरकारने शास्त्रोक्त अभ्यास करूनच बंदीचा हा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे.

# निवडणुकीच्या तोंडावर तिकिटात दिली सूट,



किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) कोरोनानंतर सर्वच रेल्वे गाड्या विशेष गाड्याच्या रुपाने धावू लागल्या, गाड्या पॅसेंजर तिकीट मात्र एक्स्प्रेसचे? अनेकवेळा पॅसेंजर गाडीचे तिकीट किनवट ते नांदेड ८० रुपये ऐवजी ४५ रुपये करावे, अशी मागणी प्रवाशांनी केली होती. मात्र रेल्वे प्रशासनाने मागणीची दखल घेतली नाही. मात्र ऐन निवडणुकीच्या तोंडावर एक्स्प्रेस गाडीचे ८० रुपये तिकीट ऐवजी पॅसेंजर गाडीचे पूर्ववत ४५ रुपये तिकीट केल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. पूर्वी पॅसेंजर रेल्वे गाडीचे तिकीट किनवट ते नांदेड ४५ रुपये होते. किनवट ते आदिलाबाद २० रुपये होते. मात्र कोरोना संसर्गामुळे रेल्वे गाड्या बंद करण्यात आल्या होत्या, कोरोनाचा संसर्ग संपल्यानंतर हळूहळू सर्व एक्स्प्रेस, पॅसेंजर गाड्या ह्या स्पेशल गाड्याच्या नावाने रेल्वे विभागाकडून सुरू करण्यात आल्या. मात्र रेल्वे प्रशासन प्रवाशांकडून पॅसेंजर गाड्यांचे तिकीट न घेता एक्स्प्रेस गाड्यांचे तिकीट घेऊ लागले. त्यामुळे गोरगरीब प्रवाशांना आर्थिक फटका सहन करावा लागला. गाडी पॅसेंजर तिकीट मात्र एक्स्प्रेसचे ही जणू लूटच सुरू होती, वर्षभरापूर्वी म्हणजे १५ जानेवारी २०२३ च्या गाडी पॅसेंजर; तिकीट एक्स्प्रेसचे या पोट मथळ्याखाली वृत्त प्रकाशित केले होते. दोन अडीच वर्षानंतर रेल्वे विभागाला तिकीट कमी करण्याचे सुचले. नेमके निवडणुकीच्या तोंडावर तिकीट कमी झाल्याने हा निवडणूक जुमला तर नाही ना? अशी चर्चा सुरू आहे.

# टेस्लासाठी भारताचा मार्ग खुला! सरकारने नवे ईव्ही धोरण जाहीर

नवी दिल्ली : देशात इलेक्ट्रिक वाहन निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारने ईव्ही-पॉलिसी मंजूर केली आहे. केंद्र सरकारने १५ मार्च रोजी ईव्ही धोरणाला मंजुरी दिली. या धोरणांतर्गत इलेक्ट्रिक चारचाकी वाहनांच्या निर्मितीला चालना दिली जाईल.अवजड उद्योग मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, या ईव्ही धोरणांतर्गत, भारतात इलेक्ट्रिक वाहन आणि त्याच्या जाहिरातीसाठी ब्लू प्रिंट तयार करण्यात आली आहे. या ईव्ही धोरणांतर्गत, देशांतर्गत ईव्ही उत्पादनावर लक्ष केंद्रित केले जाईल.अधिसूचनेनुसार, कोणत्याही कंपनीला भारतात येऊन इलेक्ट्रिक वाहने बनवायची असतील तर त्यांना किमान ४,१५० कोटी रुपयांची गुंतवणूक करावी लागेल, कमाल गुंतवणुकीवर कोणतीही मर्यादा नाही. तसेच ऑटो कंपन्यांना प्लँट उभारून इलेक्ट्रिक वाहनांचे उत्पादन ३ वर्षांत सुरू करावे लागेल.कंपन्यांना ५ वर्षांच्या आत डोमेस्टिक व्हॅल्यू ॲडिशन ५०% पर्यंत वाढवावे लागेल, म्हणजेच इलेक्ट्रिक वाहने बनवण्यासाठी स्थानिक सोर्सिंग वाढवावे लागतील. स्थानिक सोर्सिंग तिस-या वर्षी २५% आणि पुढील पाच वर्षांत ५०% पर्यंत वाढवावे लागेल. टेस्लाला आपल्या इलेक्ट्रिक कार भारतात विकायच्या आहेत, परंतु हे प्रकरण धोरणाबाबत अडकले आहे. या नव्या धोरणामुळे टेस्लाला भारतात येऊन प्लांट उभारणे सोपे होईल, अशी अपेक्षा आहे. सरकारने आपले धोरण बदलल्यामुळे आयातीवर १५% कस्टम ड्युटी भरावी लागेल, जी पूर्वी १००% होती. म्हणजे टेस्ला सारख्या कंपन्यांना भारतात त्यांच्या इलेक्ट्रिक कार विकण्याचा मार्ग मोकळा होईल.नवीन ईव्ही धोरण - देशाला इलेक्ट्रिक कारचे 'मॅन्युफॅक्चरिंग हब' बनवण्याचा उद्देश आहे.

# रमजानमुळे बाजारात फळे व खजुराची आवक वाढली:



किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) दि.१२ मार्चपासून रमजानचा पवित्र महिना सुरु होत असून महिनाभर चालणाऱ्या रोज्याच्या उपासासाठी फळ आणि खजूराची किनवटच्या बाजारात आवक वाढली आहे. शहरात फळाची व खजुराची दुकाने थाटली असून आवक वाढल्याने फळांच्या व खजुराच्या किंमती कमी झाल्या आहेत. दि. १२ मार्च मंगळवारपासून पवित्र रमजान महिन्याला आरंभ होत आहे. हा पवित्र महिना मुस्लिम बांधवांसाठी अधिक महत्त्वाचा असून या महिन्यात मुस्लिम समाज बांधव रोजा पकडतात. सायंकाळी रोजा उपवास सोडताना मुस्लिम बांधव त्यांना फळ आणि खजूराचा वापर करतात. या पार्श्वभुमीवर किनवट शहरातील बाजारपेठेत फळांची व खजूराची दुकाने थाटण्यात आली फळांचे दरही कमी झाल्याचे व्यापाऱ्यांकडून सांगण्यात आले. आहेत. आवक वाढल्यामुळे खजुराचे व रमजान महिना अधिक पवित्र असल्याने लहान, मोठे, वृद्ध, सर्वच जण रोजा करतात असे मुस्लिम बांधवाकडून सांगण्यात आले

# जागतिक महीला दिन व परिचारीका महीला व पुरुष सन्मान सोहळा

लातूर :- १५ मार्च २०२४ रोजी महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना शाखा लातूर -संचलित- उत्सव समितीच्या वतीने जागतिक महीला दिन व परिचारीका सन्मान सोहळा संपन्न झाला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी, मुख्य अधिसेविका श्रीमती राजश्री हरंगुळे या होत्या तर विलासराव देशमुख शासकीय महाविद्यालय व रुग्णालय लातूर चे अधिष्ठाता डॉ. उदय मोहीते, अतिविशेषोपचार रुग्णालयाच्या मुख्य अधिसेविका श्रीमती अमृता पोहरे मॅडम, स्त्रीरोग तज्ञ तथा मलेरिया विभागाच्या सहाय्यक संचालक, डॉ वर्षा मोहीते, शासकिय विधिज्ञ ड. मीरा कुलकर्णी, वाहतूक नियंत्रण शाखा लातूर येथे कार्यरत, महिला सहायक पोलिस निरीक्षक श्रीमती प्रतिभा ठाकूर यांच्यासह, सहाय्यक अधिसेविका श्रीमती लक्ष्मी आपटे, परिचर्या प्रशिक्षण महाविद्यालय लातूरच्या प्रभारी उप प्राचार्या तथा महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना,मुख्यालय लातूर संघटनेच्या सहसचिव श्रीमती सुकुमार गुडे जिल्हाध्यक्ष श्रीमती छाया चव्हाण व उत्सव समिती अध्यक्ष किरण निकम यांचीही उपस्थिती होती.

या कार्यक्रमादरम्यान सेवा शुश्रुषा बरोबरच सामाजिक कार्यात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महीला व पुरुष परिचारीकांना सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटना शाखा लातूर यांच्या वतीने सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.





आताच अथ परिश्रमाने मधुमेहमुक्त झालेले संजीव लहाने व श्रीमती किरण निकम, वैयक्तिक तसेच आस्थापना विभागात कर्तव्य बजावणाऱ्या वरिष्ठ लिपिक श्रीमती तेलंगे व श्रीमती मीरा .... यांचाही सन्मान करण्यात आला. अधिष्ठाता डॉ उदय मोहीते यांनी सर्वांना जागतिक मंहीला दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या व मार्गदर्शन केले. शासकीय विधिज्ञ मीरा कुलकर्णी यांनी विशाखा समिती व महीला विषयक कायद्याबाबत मार्गदर्शन केले. सहाय्यक पोलिस निरीक्षक श्रीमती प्रतिभा ठाकूर यांनी पोलिस परिचारीका व वकील हे कार्यक्षेत्र वेगवेगळे असले तरी कर्तव्य परस्पर पुरक व सारखेच आहेत असे मत व्यक्त केले. क्षीमती अमृता पोहरे यांनी उच्चशिक्षित परिचारीकांचे महत्व व कर्तृत्व विशद केले. तर अध्यक्षीय समारोप करताना महीलांनीच महीलांचा सन्मान करावा असे श्रीमती राजश्री हरंगुळे यांनी विचार मांडले कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट्र राज्य परिचारीका संघटना मुख्यालय लातूरच्या राज्यसरचिटणीस श्रीमती सुमित्रा तोटे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रीमती उणिता देशमाने व रुपाली वाघमारे यांनी केले तर आभार संघटनेच्या लातूर शाखा अध्यक्ष श्रीमती छाया चव्हाण यांनी व्यक्त केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उत्सव समिती अध्यक्ष श्रीमती किरण निकम, उपाध्यक्ष श्रीमती मीना दैवज्ञ, श्रीमती ज्योती भारती , सुशोभन समिती अध्यक्ष श्रीमती वनमाला पांचाळ, श्रीमती सुधा तोरणेकर, मिनाक्षी गोडबोले,संजीव लहाने, दिपक शिंदे, विवेक वागलगावे, भगवान केंद्रे,रेणुका पाटील,श्री संजीव लहाने, मजहर शेख, शुभम वानखेडे, आराधना क्षिरसागर,रुपल बंडगर, ज्योत्स्ना कोकणे, केंद्रे प्रतिमा, अमित मलिशे, सुधाकर केदार इतर पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले

## लोकसभा निवडणुकीबाबत आज जिल्हाधिकारी कार्यालयात नोडल अधिकारी, शासकीय कार्यालय प्रमुखांची बैठक

लातूर, दि. १५ : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने पूर्वतयारीचा आढावा आणि आवश्यक सूचना देण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या उपस्थितीत शनिवार, १६ मार्च २०२४ रोजी निवडणूक विषयक नोडल अधिकारी आणि सर्व शासकीय विभाग प्रमुखांच्या आढावा बैठक आयोजित करण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये या बैठका होतील. निवडणूक विषयक सर्व नोडल अधिकारी, सर्व उपविभागीय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, तहसीलदार यांची आढावा बैठक १६ मार्च रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली आहे. तसेच १६ मार्च रोजी सायंकाळी ५.३० वाजता सर्व कार्यालय प्रमुखांची आढावा बैठक होणार आहे, असे उपजिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. भारत कदम यांनी कळविले आहे.

# वयोवृद्ध पत्रकारांची हेळसांड थांबविण्यासाठी निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

मुंबई दिनांक १५: राज्यातील ज्येष्ठ पत्रकारांच्या सन्मान निधीत अकरा हजारावरून वीस हजार रुपये अशी भरीव वाढ करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. यासंदर्भात अनेक पत्रकार आणि पत्रकार संघटनांनी केलेल्या मागणीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा निर्णय घेतला. वयोवृद्ध पत्रकारांची हेळसांड थांबविण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. यासंदर्भात गेल्या वर्षीच्या अधिवेशनात विधानपरिषदेत राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभुराज देसाई यांनी देखील यासंदर्भात चर्चा उपस्थित केली होती त्याचप्रमाणे मुख्यमंत्र्यांनी मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाच्या पुरस्कार वितरण कार्यक्रमात अर्थसहाय वाढविण्याची घोषणा केली होती.

ज्येष्ठ पत्रकारांप्रती आदरभाव, कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि वृध्दावस्थेत त्यांची हेळसांड होऊ नये म्हणून आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेत अधिस्वीकृतीधारक पात्र ज्येष्ठ पत्रकारांना सध्या ११ हजार रुपये सन्मान निधी दर महिन्याला मिळतो. आता नऊ हजार रुपयांनी ही रक्कम वाढविण्याचा निर्णय घेण्यात आल्याने राज्यातील वयोवृद्ध पत्रकारांना मोठा दिलासा मिळाला आहे. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत ही योजना राबविण्यात येत असून निकष व कार्यपध्दतीनुसार प्रत्यक्ष पात्र अधिस्वीकृतीधारक ज्येष्ठ पत्रकारांनाच या योजनेचा लाभ देण्यात येईल. ही मासिक अर्थसहाय्याची रक्कम शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी मधील ५० कोटी इतक्या मुदत ठेवीच्या रकमेवरील व्याजाच्या रकमेतूनच देण्यात येईल. ही रक्कम डीबीटीने संबंधित पत्रकारांच्या खात्यात जमा होईल. गेल्या वर्षी मार्चमध्येच हा निधी ३५ कोटींवरून वाढवून ५० कोटी करण्यात आला आहे. राज्यात अनेक वयोवृद्ध पत्रकार हलाखीच्या परिस्थितीत जगत आहेत. त्यांना वैद्यकीय उपचारासाठी देखील आर्थिक मदत नसते. या वाढीव निधीमुळे त्यांना चांगले अर्थसहाय मिळेल.

# ७८० भटक्या श्वानांना अँटीरेबीज लसीकरण शहरातील भटक्या श्वानांचा त्रास कमी होणार

लातूर/प्रतिनिधी: शहरातील श्वानांची वाढती संख्या व त्यामुळे वृद्ध नागरिक,लहान मुले आणि महिलांना होणारा त्रास लक्षात घेता मनपाच्या वतीने अँटीरेबीज लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे.या अंतर्गत आतापर्यंत ७८० भटक्या कुत्र्यांचे लसीकरण करण्यात आले असून आपल्या परिसरात भटक्या कुत्र्यांचा त्रास असेल तर संपर्क साधण्याचे आवाहन मनपा व उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे. लातूर शहरात भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे.यामुळे वृद्ध नागरिक,लहान मुले व महिलांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अनेकदा ही भटकी कुत्री नागरिकांना चावा घेऊन जखमी करत आहेत.हा त्रास कमी करण्यासाठी भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण करणे आवश्यक आहे.त्यासाठी मनपाकडून मुलुंड येथील ग्लोबल फाउंडेशनच्या सहकार्यातून अँटीरेबीज लसीकरण करण्यात येत आहे.या अंतर्गत लसीकरण करून कुत्र्यांना त्यांच्या मूळ ठिकाणी सोडण्यात येते. कुत्र्यांचा वाढता त्रास लक्षात घेता ही प्रक्रिया अधिक परिणामकारक व गतिमान करण्याचा निर्णय महानगरपालिकेकडून घेण्यात आला आहे. त्यानुसार एप्रिल महिन्यापासून दर शनिवारी अँटीरेबीज लसीकरण मोहीम राबविली जाणार आहे.सध्याही प्रभाग निहाय लसीकरण केले जात आहे. ज्या भागात भटक्या कुत्र्यांचा त्रास अधिक आहे त्या भागातील नागरिकांनी उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशनच्या ८६५५३२३१६८ या




दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.त्यानुसार माहिती घेऊन त्या-त्या परिसरात दर शनिवारी अँटीरेबीज लसीकरण करणे शक्य होईल.नागरिकांनी आपल्या भागातील भटक्या श्वानांची माहिती त्या क्रमांकावर द्यावी. यामुळे शहरातील नागरिकांना होणारा त्रास कमी करणे शक्य होईल, असे आवाहन लातूर शहर महानगरपालिका व उत्कर्ष ग्लोबल फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

# मानव विकास निर्देशांकात भारत एक पाऊल पुढे

नवी दिल्ली : मानव विकास निर्देशांकात (एचडीआय) भारताची स्थिती अजूनही चतिंजनक आहे. या निर्देशांकात भारताच्या स्थानात अवघ्या एक क्रमांकाची प्रगती झाली. मात्र २०२१ मध्ये जगातील १९१ देशांपैकी १३५ व्या क्रमांकावर असलेला भारत २०२२ मध्ये १९३ देशांपैकी १३४ व्या क्रमांकावर आहे.संयुक्त राष्ट्रांच्या विकास कार्यक्रम (यूएनडीपी) अहवालात भारतासह सर्व देशांची यासंदर्भातील आकडेवारी उघड झाली आहे. भारताचा मानव विकास निर्देशांक २०२१ मधील ०.६३३ च्या तुलनेत २०२२ मध्ये ०.६४४ असा किंचित प्रमाणात सुधारला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या विकास कार्यक्रमाचा 'ब्रेकिंग द ग्रिडलॉक: रीइमेजिनिंग कोऑपरेशन इन ए पोलराइज्ड वर्ल्ड' शीर्षकाचा हा अहवाल नुकताच प्रकाशित करण्यात आला. भारताने लैंगिक असमानता निर्देशांकातही सुधारणा केली.मानव विकास निर्देशांकात भारताने एकाच स्थानाने प्रगती केली असली तरी लैंगिक असमानता निर्देशांकात मात्र १४ स्थानांनी प्रगती केली. ते २०२१ मध्ये १२२ वरून २०२२ मध्ये १०८ वर पोहोचले. जीआयआय प्रामुख्याने प्रजनन आरोग्य, सशक्तीकरण व श्रमिकांची बाजारपेठ या तीन घटकांवर मोजला जातो. भारताचा जीआयआय जागतिक सरासरी ०.४६२ च्या तुलनेत चांगला असून तो ०.४३७ इतका आहे.देशात श्रमशक्तीच्या सहभाग दरात भारतातील दरी मोठी आहे. यात महिला (२८.३ टक्के) व पुरुष (७६.१ टक्के) या तब्बल ४७.८ टक्क्यांचे अंतर आहे. मानव विकास निर्देशांकात भारताचे स्थान एकाच क्रमांकाने सुधारले असले तरी



१९९० पासून आतापर्यंत देशाने लक्षणीय प्रगती केली. १९९०च्या तुलनेत आयुर्मान ९.१ वर्षांनी वाढले आहे.शालेय शिक्षणाची सरासरी वर्षे ३.८ वर्षांनी वाढली आहेत. त्यामुळे, १९९० ते २०२२ दरम्यान मानव विकासाच्या बाबतीत भारत मध्यम श्रेणीत आहे. भारताने २०२२ मध्ये आयुष्मान, शिक्षण व दरडोई एकूण राष्ट्रीय उत्पन्न आदी सर्व मानव विकास निर्देशांकात सुधारणा नोंदविली. एकीकडे श्रीमंत देश विक्रमी मानव विकास करत असताना दुसरीकडे गरीब देशांतील निम्मे देश आपल्या प्रगतीच्या पूर्व-संकट स्तरापेक्षा खालील क्रमांकावर आहेत. जगभरात असमानतेत वाढ जगभरात असमानतेत सातत्याने वाढ होत असल्याचेही 'यूएनडीपी'च्या अहवालात म्हटले आहे. सुमारे २० वर्षांच्या अभिसरणानंतर २०२० पासून श्रीमंत आणि गरीब देशांतील दरी वाढत आहे. वस्तूंच्या जागतिक व्यापारापैकी ४० टक्के व्यापार तीन किंवा त्यापेक्षाही कमी देशांत होतो, याकडेही अहवालात लक्ष वेधले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE